महाराष्ट्र शासन

क्रमांक: एनजीसी–३५८९/[१८५५]विशि–२
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२
दिनांक: २८ जून, १९८९.

तात्काळ

प्रति,
कुलसचिव,
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

विषय: १९८९–९० या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांची नवीन महाविद्यालये उघडण्यास परवानगी देण्याबाबत.

महोदय,

१९८९–९० या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनाकडे विद्यापीठांकडून आलेल्या शिफारशींचा विचार करून नवगण शिक्षण संस्था या संस्थेच्या १९८९–९० पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३[४] व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
|---|---|
| पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड | कला, वाणिज्य. |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे :–

१. सदर महाविद्यालयास सध्या विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्र. एनजीसी–२०८८/[१६५२]विशि–२–अ दि. ४. १. १९८९ अन्वये लागू करण्यात आलेल्या अनुदान सूत्रानुसार या महाविद्यालयाला अनुदानसहित तत्वावर आणण्याचा विचार यथावकाश करण्यात येईल.

२. ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्या प्रत्येक विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात कमीत कमी ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला [आदिवासी क्षेत्रातील महाविद्यालयांकरिता ही विद्यार्थीसंख्या कमीत कमी ३० अशी आहे. ] तरच तो वर्ग १९८९–९० पासून सुरू करावा तसेच १९८९–९० या शैक्षणिक

...२/..

वर्षाच्या शेवटी होणा-या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत कमीत कमी ३० विद्यार्थी असले पाहिजेत. [ आदिवासी विभागातील महाविद्यालयात कमीत कमी २२. ]

३. स्थानिक चौकशी समिती, एक्झीक्युटीव्ह कौन्सिल व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर कलम ४३[६] व [७] यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

४. संबंधित संस्थांना महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी देताना त्या संस्थांना विद्यापीठाने असे नि:संदिग्धपणे कळवावे की, प्रवेश तात्पुरत्या स्वरूपात देऊन जर ४० विद्यार्थी प्रवेश घेतील तरच प्रत्यक्षात वर्ग सुरू करावेत. महाविद्यालयात पुढे देण्यात येणारे संलग्नीकरण ही अट पूर्ण करण्यावरच अवलंबून राहील. अन्यथा महाविद्यालयांना संबंधित विद्याशाखा बंद करावी लागेल. कलम ४३[६] व [७] अनुसार संलग्नीकरणाचा अंतिम प्रस्ताव शासनाकडे पाठविताना ही अट पूर्ण झाली किंवा नाही याबद्दल प्रस्तावामध्ये उल्लेख करावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

[ द. रा. माळी ]
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
१] शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे
२] प्रशासनाधिकारी [उच्च शिक्षण अनुदान ], औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
३] सचिव, नवगण शिक्षण संस्था, बीड.
४] निवड नस्ती.